# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ३१/१०/२०२४ अनु.क्र.१९९

(अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुरी/९५१३/२०२४ अमरावती शहर दिनांक २९/१०/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद मंत्रालयीन अधिकारी/ कर्मचारी यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीतील अर्जित रजा ही विधानसभा निवडणुक-२०२४ ची आचारसंहिता सुरु असल्यामुळे प्रशासकीय कारणास्तव " **अमान्य** " करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | मागणी केलेल्या अर्जीत रजा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश सोंळके, प्रमुख लिपीक नेम-अर्ज शाखा | अर्ज शाखा | दि.०४/११/२०२४ ते दि.०८/११/२०२४ **एकुण ०५ दिवस** पुढील दि.०९/११/२०२४ व दि.१०/११/२०२४ चे शासकीय सुट्टीला जोडुन | **अमान्य** |
| २ | श्री. देवानंद भोजे, उच्च श्रेणी लघुलेखक नेम- पोलीस उपायुक्त कार्य. परि-२ | पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२ | दि.०४/११/२०२४ ते दि.०६/११/२०२४ **एकुण ०३ दिवस** मागील दि.०१/११/२०२४ व दि.०३/११/२०२४ चे शासकीय सुट्टीला जोडुन | **अमान्य** |
| ३ | श्री.संगीता तायडे, प्रमुख लिपीक नेम- लेखा शाखा | अर्ज शाखा | दि.०४/११/२०२४ ते दि.०८/११/२०२४ **एकुण ०५ दिवस** | **अमान्य** |

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-२/गैरहजर/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोशि-१६७० तंतरपाळे/९३७७/२०२४ अमरावती शहर दिनांक २३/१०/२०२४**

### आदेश

**संदर्भ :-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक २१९९/२०२३, , दिनांक ०९/१०/२०२३

२) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक २४५१/२०२३, दिनांक १६/११/२०२३

३) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/ का.दा.नो/पोशि-१६७० तंतरपाळे/१५२१६/२०२३, दिनांक १३/१२/२०२३

**कसुरदारचे नाव :-** पोशि/१६७० प्रफुल तंतरपाळे, तत्का.नेमणुकपो.स्टे.वलगांव (सध्या नेमणुक पो.मुख्या), अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोशि/१६७० प्रफुल भिमराव तंतरपाळे, तत्का.पोलीस स्टेशन वलगांव (सध्या पोलीस मुख्यालय), अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्ही पोलीस स्टेशन वलगांव येथे नेमणुकीस असतांना दिनांक ०७/०९/२०२३ ते दिनांक १६/०९/२०२३ व पुन्हा दिनांक ०७/११/२०२३ ते दिनांक १६/११/२०२३ पर्यत एकुण २० दिवस वरिष्ठाना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन गैरहजर राहिले असुन तुम्ही वारंवार गैरहजर राहाण्याच्या सवईचे असुन तुम्ही तुमचे कर्तव्य टाळण्याच्या दृष्टीने जाणीवपुर्वक अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहिले आहे. तुमच्या अश्या स्वरुपाचे वर्तणुकीवरुन व जाणीवपुर्वक व हेतुपुरस्परपणे कर्तव्य टाळण्याच्या उदेशाने गैरहजर राहिले असुन तुम्ही वरिष्ठाना कोणतीही माहिती दिली नाही, लेखी सुध्दा कळविले नाही. तुम्हाला नेमुण दिलेल्या कर्तव्यावर न जाता व वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता.तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे.तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केले नसल्याने पुन्हा या कार्यालयाचे पत्र क्रमांक २४१४/२०२४, दिनांक ०४/०३/२०२४ अन्वये कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर करणे करीता संधीचे पत्र देण्यात आले आहे. संधीचे पत्र सुध्दा तुम्हाला तामील झालेले असुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तरी तुम्हाला दिनांक २५/०९/२०२४ रोजी मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलावुन तुमचे मौखीक म्हणणे ऐकुण घेतले असुन व सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५०००/- (अक्षरी पाच हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

# वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वेतन निश्चिती

**०१.पोआअ/आस्था-वेनिलि/सुधा.किमान वेतन/९४५९/२०२४ अमरावती शहर दिनांक २५/१०/२०२४**

## आदेश

शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वेपुर-११२२/प्र.क्र.६/सेवा-९ दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ नुसार सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना ज्या पदावर दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर या नियमांच्या जोडपत्र तीन नुसार सेवाप्रवेश वेतन अनुज्ञेय ठरते, अशा पदांवर दिनांक ०१ जानेवारी २००६ पुर्वी नामनिर्देशनाने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या आणि दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी पोटनियम (१) कलम (अ) अन्वये वेतननिश्चिती केलेल्या शासकिय कर्मचा-याचे वेतन, सरळसेवा नियुक्तींसाठी जोडपत्र तीन मध्ये विहिती केलेल्या सेवाप्रवेश वेतनापेक्षा कमी निश्चिती होत असेल तर, ते दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून उंचावून देण्यात यावे कि, ज्यामुळे अशा सेवाप्रवेश वेतनापेक्षा ते कमी असणार नाही असे नमूद करण्यात आले आहे.

**त्याअनुषंगाने मपोहवा/१४०, वैशाली मिलींद फुले, नेमणूक पोलीस मुख्यालय,अमरावती शहर, नियुक्ती दिनांक १५.०२.२००३,** यांची शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

| **पदनाम** | **वेतनश्रेणी** | **ग्रेड पे** |
|---|---|---|
| पोलीस शिपाई | रु.५२००-२०२००/- | रु.२०००/- |
| पोलीस नाईक | रु.५२००-२०२००/- | रु.२४००/- |

| **विद्यमान वेतन व दिनांक** | | | **सुधारीत देय वेतन व दिनांक** | | |
|---|---|---|---|---|---|
| **वेतनवाढीचा दिनांक** | **विद्यमान वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन** | | **वेतनवाढीचा दिनांक** | **सुधारीत वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन** | |
| | **वेतन बँड** | **ग्रेड वेतन** | | **वेतन बँड** | **ग्रेड वेतन** |
| ०१/०१/२००६ | ६२७०/- | रु.२०००/- | ०१/०१/२००६ | रु. ६४६०/- **शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ नुसार अनुज्ञेय वेतन** | रु.२०००/- |
| ०१/०७/२००६ | रु.६२७०+२५०=६५२०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००६ | रु.६४६०+२६०=६७२०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००७ | रु.६५२०+२६०=६७८०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००७ | रु.६७२०+२७०=६९९०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००८ | रु.६७८०+२७०=७०५०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००८ | रु.६९९०+२७०=७२६०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००९ | रु.७०५०+२८०=७३३०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००९ | रु.७२६०+२८०=७५४०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१० | रु.७३३०+२८०=७६१०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१० | रु.७५४०+२९०=७८३०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०११ | रु.७६१०+२९०=७९००/- | रु.२०००/- | ०१/०७/२०११ | रु.७८३०+३००=८१३०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१२ | रु.७९००+३००=८२००/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१२ | रु.८१३०+३१०=८४४०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१३ | रु.८२००+३१०=८५१०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१३ | रु.८४४०+३२०=८७६०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१४ | रु.८५१०+३२०=८८३०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१४ | रु.८७६०+३३०=९०९०/- | रु.२०००/- |
| १५/०२/२०१५ | रु.८८३०/- सुआप्रयो अंतर्गत पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याने विकल्पानुसार देय वेतन. | रु.२४००/- | १५/०२/२०१५ | रु.९०९०/- सुआप्रयो अंतर्गत पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याने विकल्पानुसार देय वेतन. | रु.२४००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१/०७/२०१५ | रु.८८३०+३३०=९१६०/- | रु.२४००/- | ०१/०७/२०१५ | रु.९०९०+३४०=९४३०/- | रु.२४००/- |
| ०१/०७/२०१५ | रु.९१६०+३४०=९५००/- | रु.२४००/- | ०१/०७/२०१५ | रु.९४३०+३५०=९७८०/- | रु.२४००/- |

दिनांक ०१/०१/२०१६ पासून पुढील वेतनात बदल होत नसल्याने सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतननिश्तिची आवश्यकता नाही.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस